# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १२८/२००७/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. शंकर महादेव नखाते,<br>मु.पो. खर्डी,<br>ता. पंढरपूर, जि. सोलापूर. | तक्रारदार |
| **<u>विरूध्द</u>** | |
| १) कार्यकारी अभियंता(का) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, उर्जानगर, सुपर मार्केट समोर,<br>सोलापूर-४१३००१.<br>२) कार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु विभाग, पंढरपूर, जि. सोलापूर.<br>३) सहाय्यक अभियंता (प्रभारी),<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु ग्रामीण उपविभाग, पंढरपूर, जि. सोलापूर. | विरूध्द पक्षकार |

**कोरम :-** १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) श्री. बी.डी. नाईकवाडी, सदस्य-सचिव

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

श्री. शंकर महादेव नखाते, मु.पो. खर्डी, ता. पंढरपूर यांनी मंडळ पातळीवरील अंतर्गत तक्रार निवारण कक्षामध्ये दिनांक ८-३-२००७ रोजी चुकीच्या बिलाबाबत तक्रार दाखल केली होती. तथापि त्याकामी कक्षाने विहित मुदतीत तक्रारीचे निवारण केले नाही / कोणताही आदेश पारीत केला नाही. त्यामुळे ग्राहकाने दिनांक २९-६-२००७ रोजी प्रस्तुतचे अपील या मंचामध्ये दाखल केले आहे.

अपीलदाराच्या तक्रारीचे स्वरूप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते.

श्री. नखाते यांच्या शेती पंपास वीज पुरवठा करणा–या एका फ्युजमधून विद्युत पुरवठा होत नसल्याचे दिसून आल्या वरून त्यांनी शाखा कार्यालयात जाऊन त्याबाबत चौकशी केली. त्यावेळी त्यांना कोणीही दाद दिली नाही. मात्र त्यांच्याकडे वीज बिलाची थकबाकी असल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर त्यांना दिनांक ५–११–२००५ रोजी कृषी संजीवनी योजनेचे बील रू. २,५२०/– व नियमित बील रू. १७,०४०/– देण्यात आले. सदरचे बील चुकीचे असल्याबाबत त्यांनी शाखा, उपविभाग तसेच विभागीय कार्यालयामध्ये तक्रार केली. तथापि त्यांची दखल न घेता त्यांना अपमानास्पद वागणूक दिली व बील न भरल्यास वीज कनेक्शन तोडण्याची धमकी वि.प. यांनी दिली. त्यामुळे ग्राहकाने भितीपोटी नाईलाजास्तव दिनांक ९–११–२००५ रोजी रु ३,०००/– रकमेचा भरणा केला. वि.प. यांनी कृषी संजीवनी योजनेची बिले वेळेवर दिली नाहीत. तसेच नियमीत बिलेही वि.प.ने दुरूस्त करून दिली नाहीत. त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. तरी त्यांना कृषी संजीवनी योजनेचा लाभ मिळावा व त्यानुसार चुकीच्या वीज बिलामध्ये दुरूस्ती करण्यात यावी अशी त्यांची एकंदरीत तक्रार असल्याचे दिसून येते.

प्रकरणी सुनावणीची तारीख २४–७–२००७ रोजी विभागीय कार्यालय पंढरपूर येथे नेमण्यात आली होती. त्यावेळी तक्रारदार श्री. नखाते हे स्वत: उपस्थित होते. वि.प. यांच्यावतीने श्री. साळे, कार्यकारी अभिंयता तथा नोडल ऑफीसर, मंडळ कार्यालय, सोलापूर , श्री. शेळके, कार्यकारी अभियंता, पंढरपूर विभाग, श्री. इंगळे, सहाय्यक अभियंता, उपविभाग, पंढरपूर, श्री. म्हेत्रे, उच्चस्तर लिपीक व श्री. पाटील, कनिष्ठ अभियंता शाखा खर्डी हे उपस्थित होते. सुनावणीचेवेळी श्री. नखाते यांनी सुरूवातीस अनुसूची "अ" सोबत सादर केलेल्या निवेदनाप्रमाणे आपली तक्रार असल्याचे सांगितले. मात्र शेवटी त्यांनी असे सांगितले की सहाय्यक अभियंता, उपविभाग पंढरपूर, वि.प. क्र. ३ यांनी दि. १९–७–२००७ रोजी आपल्याला पत्र पाठवून कृषी संजीवनी योजनेकामी बील भरण्यासाठी विहीत केलेला कालावधीबाबत केलेल्या खुलाशाने आपले समाधान झाले आहे. त्यामुळे कृषी संजीवनी योजनेचा लाभ मिळाला नसल्याची तक्रार आपण गैरसमजुतीने केली असल्याचे सांगितले. तसेच नियमीत बिलाबाबतही आपली कांहीही तक्रार राहिली नसल्याचे त्यांनी सांगितले. यावरून अपीलदाराच्या तक्रारीचे निवारण झाले असल्याची मंचाची धारणा आहे.

तरीसुध्दा याठिकाणी मंचास असे आवर्जुन नमूद करावेसे वाटते की श्री. नखाते यांनी मंचामध्ये विहीत नमुन्यात अपील दाखल केल्यानंतर दि. ४–७–२००७ रोजी कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफीसर, मंडळ कार्यालय, सोलापूर यांना मंचाने पत्र पाठवून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ६.१३ नुसार तक्रारदाराने केलेल्या तक्रारीवर वितरण परवानेधारकाकडून मुद्‌देनिहाय अभिप्राय घेऊन त्यांनी मंचास अहवाल पाठविला नाही. अंतर्गत तक्रार निवारण कक्षामध्ये ग्राहकाने दि. ८–३–२००७ रोजी विहित "क्ष" नमुन्यात तक्रार दाखल केल्यानंतर त्याकामी सुनावणी ठेवली नाही. तसेच प्रकरणी ६० दिवसांचे मुदतीत कोणताही आदेश पारीत केला नाही. कक्षाची ही दुरावस्था आक्षेपार्ह तसेच असमर्थनीय आहे असे मंचाचे स्पष्ट मत आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारांत घेऊन मंच खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

श्री. नखाते यांनी आपल्या तक्रारीचे निवारण झाले असल्याचे सांगितल्यावरून अपील निकाली काढण्यात आले आहे.

| ( बी. डी. नाईकवाडी ) | ( जी. सी. लेले ) | ( के. व्ही. पाटील ) |
|---|---|---|
| सदस्य – सचिव | सदस्य | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |